म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय सां.वा.
दा.क्र. १२५८



# कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401257
BVBK-0401257

## विमा-महर्षि

# विमान-महर्षि


वामन हरी खाडिलकर
बी. ए., बी. कॉम्.


कांहींतरी नवेंच करा : ३२


वाचनालय शाखा
वा. क्र. ९२५८ दिनांक 20/5/59
विषय बा.वा. क्र. ........

BVBK-0401257
BVBK-0401257



पन्नास नये पैसे

वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.

श्री : १९६

© : १९५९
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ,
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

आवृत्ति पहिली : १९५९
आवृत्ति दुसरी : १९६४

मूल्य ५० नये पैसे

मुद्रक :
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस, कुर्ला रोड,
अंधेरी, मुंबई ५९.



विमा हा आतां आपल्या देशांत राष्ट्रीय व्यवसाय झालेला आहे. सरकारी बळ आणि यंत्रणा त्याच्या पाठीशीं उभीं आहेत. परंतु प्रारंभींच्या काळांत स्वदेशी विमा कंपनी काढून ती यशस्वी रीतीनें चालविणें आणि तिला साऱ्या देशांत अग्रस्थान मिळवून देणें ही अशक्यप्राय गोष्ट होती. ती शक्य करून दाखविण्याची कर्तबगारी कै. अण्णासाहेब चिरमुले यांनीं प्रथम केली; आणि त्यामुळेंच त्यांना 'विमा-महर्षि' ही सार्थ पदवी महाराष्ट्रानें अर्पण केली. केवढे कष्ट, केवढा संयम आणि केवढें विशुद्ध चारित्र्य अशीं कामें करणारांच्या ठिकाणीं असावें लागतें याचें विमा-महर्षि हें प्रत्यक्ष उदाहरण आहे.

...ालय ...
९२५८ दि० २०।५।५९
ग्रा·वी·

# विमा-महर्षि: अण्णासाहेब चिरमुले

गेल्या शतकांत इंग्रजांनीं हिंदुस्थानांत पाय रोवल्या-पासून हिंदी जनतेचा भविष्यकाळ अंधारून गेला होता. राजकीय स्वातंत्र्यासाठीं चळवळी सुरू झाल्या, त्या वाढूंहि लागल्या हें खरें. तथापि सारा देश, सारी जनता त्या राजकारणांतच जणूं घुटमळत राहिली. महाराष्ट्रांत तर ही परिस्थिति विशेषच जाणवण्यासारखी होती. त्याकाळीं व्यापारी दृष्टीनें इतर प्रांतांच्या तुलनेनें महाराष्ट्रापुढें अधिकच अंधार होता. लोकांजवळ पैसा नाहीं, व्यापारी लवचिक मनोवृत्ति नाहीं व या बाबतींतला अनुभवहि नाहीं. यामुळें व्यापार-क्षेत्रांत महाराष्ट्रापुढें अफाट दर्या आणि घनदाट अंधार याखेरीज त्यावेळीं कांहींहि नव्हतें.

वासुदेव गणेश अर्थात् अण्णासाहेब चिरमुले हे याच काळांत जन्मास आले. बॅ. जयकरांनीं म्हटल्याप्रमाणें या 'अद्भुत दैवी' पुरुषानें आपली 'अद्भुत दैवी' 'वेस्टर्न इंडिया' ही विमा कंपनी स्थापन करून महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांत एक प्रचंड दीपस्तंभ उभा केला. त्याच्या प्रकाशांत उभ्या महाराष्ट्रानें व्यापारी स्फूर्ति घेतली.

वासुअण्णांचे वडील गणेशपंत हे कांहीं काळ सरदार रास्त्यांचे कारभारी होते. रास्त्यांची जहागिरी गेल्या-नंतर ते साताऱ्याला येऊन स्थायिक झाले. परंतु त्यांची परिस्थिति थोडी ओढगस्तीचीच होती. इ. स. १८६४ सालीं वैशाख अमावास्येला वासुअण्णांचा जन्म झाला. वासुअण्णांचें शालेय व महाविद्यालयीन शिक्षण त्यांच्या वडील बंधूंनीं आपल्या अल्प पगारांतून केलें. अण्णा हुषार होते म्हणून त्यांना नादारी मिळत असे. शाळेच्या आपल्या सर्व शिक्षणक्रमांत त्यांनीं एकहि पुस्तक विकत घेतलें नाहीं. त्यांचा कपड्यांचा फक्त एकच जोड असे. तथापि १८८१ सालीं जेव्हां ते मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले तेव्हां त्यांचा क्रमांक त्यांच्या शाळेंत पहिला आला.

महाविद्यालयामध्यें ना. गोपाळराव गोखले, प्रा. विजा-पूरकर, प्रि. र. ना. आपटे ही मंडळी अण्णासाहेबांची सहाध्यायी होती. या सर्वांची अभ्यासांत मोठी चुरस असे. बी. ए. झाल्यावर गोखले यांनीं त्यांना डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद होण्यासाठीं बोलावलें होतें. पण शिक्षणक्षेत्र ही आपली जीवनाची कक्षा नाहीं हें त्यांनीं ठरविलें असल्यानें त्यांनीं गोपाळरावांना नकार दिला.

बी. ए. झाल्यावर एल्एल्. बी. च्या शिक्षणासाठीं त्यांनीं तात्पुरती नोकरी मुंबईस 'दि मराठा स्कूल' या शाळेंत धरली. ही शाळा राजारामशास्त्री भागवत यांनीं स्वसंस्कृति

व स्वदेश यांच्या अभिमानानें स्थापन केलेली होती. याच शाळेंत वासुअण्णांनीं जीवनांतील महान गुणविशेष आत्मसात करून घेतले. राजारामशास्त्री हे विद्वान होतेच; शिवाय ते मोठे निःस्पृह, उदात्त आणि परोपकारीहि होते. त्यांच्या सान्निध्यांत राहून वासुअण्णांनीं हेहि गुण आपल्या ठिकाणीं मुरवून टाकले.

परंतु मुंबईचा खर्च भागेना व वर्षांमागें वर्षें गेलीं, तरी ते एल्एल्. बी. होईनात. म्हणून अखेर वासुअण्णांनीं जमखंडी येथें जरा मोठ्या पगारावर एका शाळेंत नोकरी धरली. त्यानंतर दोन वर्षांतच ते एल्एल्. बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

येथील शाळेंत नोकरीवर असतांना त्यांनीं आपल्या अंगच्या नेकी, कर्तव्यनिष्ठा आणि कडक शिस्त इत्यादि अनेक गुणांचा इतका प्रभाव पाडला कीं ते तेथून निवृत्त झाले तरी त्यांची आठवण त्या शाळेच्या इतिहासांत कायम राहिली. विठ्ठल रामजी शिंदे व ज. स. करंदीकर हे त्यांचे तेथील विद्यार्थी होते.

या शाळेंत एकदां एक गंमत झाली. वेळापत्रकें ठरविलीं त्यावेळी चूकून सकाळच्या शाळेची वेळ अर्धा तास अगोदरची पडली व पहिला तास अंधारांत सुरू होण्याचा प्रसंग आला; पण त्यावेळीं अंधार असल्यानें शाळेंत मुलें अगर शिक्षक कोणीहि आले नाहींत. झुंजूमुंजू दिसूं लागल्या-

वर शाळेंत येऊन मुलें बाकांवर बसूं लागलों तों खुर्चीवर अण्णासाहेब बसलेले त्यांना दिसले; वेळापत्रकाप्रमाणें वेळ होतांच ते वर्गावर येऊन बसले होते. तेव्हांपासून वक्तशीरपणाशीं त्यांचें नांव कायमचें जोडलें गेलें.

एलएल्. बी. झाल्यावर त्यांची मुधोळ संस्थानांत मुन्सफ म्हणून नेमणूक झाली. ज्यांचा खटला त्यांच्या न्यायालयांत सुरू असेल अशा रोज फिरावयास येणाऱ्या स्नेह्यांसहि त्या मुदतींत घरीं येऊं नका असें अण्णा सांगत. "सावकारांचें शत्रु व गोरगरिबांचें कनवाळू" अशी त्यांची त्या दिवसांत ख्याति होती. पण अशा वरिष्ठ दर्जाचीं माणसें जुन्या संस्थानी जमान्यांत किती दिवस व कशीं टिकणार ? एक दिवस असा आला कीं न्यायदान विशिष्ट माणसाच्या बाजूनें व्हावें असा राजेसाहेबांचा आदेश आला. तथापि अण्णासाहेबांनीं योग्य माणसाच्या बाजूनेंच निकाल दिला. मात्र त्याच्या जोडीस आपल्या नोकरीचें त्यागपत्रहि त्यांनीं राजेसाहेबांकडे पाठवून दिलें !

गुणांची खाण :

१८९४ सालीं मुधोळ सोडून अण्णासाहेब साताऱ्यांत येऊन राहिले. त्यांनीं तेथें स्वतंत्र वकिली करण्यास सुरुवात केली. येतांना त्यानीं वकिली नीट चालूं लागेपर्यंत पुरेल इतका धनसंचय जसा आणला होता तसाच अनेक गुणांचा प्रवृद्ध सांठाहि आपल्याबरोबर आणला होता.

भारतीय युद्धांत जय मिळावा म्हणून धनंजयाला कोणी द्रव्य, कोणी सैन्य, कोणी रथ दिले व विविध देवतांनीं त्याला अनेक अस्त्रें दिलीं. त्याप्रमाणें जीवनसंग्रमांत यशश्रीनें माळ घालावी म्हणून अण्णासाहेबांना अनेकांनीं अनेक गोष्टी दिल्या होत्या. त्यांच्या मातेनें त्यांना अक्रोध दिला. वडिलांनीं अविरत उद्योगाची देणगी दिली. वडील बंधूंनी हृदयाची विशालता शिकविली. आणि राजारामशास्त्री भागवत यांनीं निःस्पृहता, त्याग व परहिततत्परता या गुणांची त्यांच्यामध्यें पेरणी केली. घरच्या आर्थिक परिस्थितीनें त्यांना काटकसरीचे धडे दिले. लो. टिळक यांनीं देशभक्ति दिली. आगरकर यांनीं 'समयीं धारिष्ट' धरण्यास शिकविलें. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांनीं त्यांना अखंड वाचनाचा वर दिला. या सर्वांवर कळस म्हणून कीं काय दत्तगुरूंनीं त्यास वाक्संयम किंवा मितभाषित्वाचा प्रसाद दिला.

या सर्व गुणांनीं सुसज्ज होऊन ज्यावेळीं ते साताऱ्यांत आले त्यावेळीं तेथील मंडळींनीं त्यांचें अत्यंत प्रेमानें स्वागत केलें. त्या सर्वांना अण्णासाहेबांचें आगमन हा मोठा लाभच वाटला. सादर दृष्टीनें लोक त्यांच्याकडे पाहूं लागले. साताऱ्यांत आल्यावर ते विविध स्थानिक संस्थांचे सभासद झाले व त्यांचा सल्ला प्रत्येक सार्वजनिक कामांत घेण्यांत येऊं लागला.

साताऱ्यांत येतांच त्यांनीं लॉ क्लास काढला. पण त्या कायद्याच्या शिक्षण वर्गाला त्यांनीं शुल्क (फी) ठेवलें नव्हतें. हें त्यांचें वैशिष्टच. १८९५ सालीं लो. टिळक यांनीं या वर्गाला भेट दिली तेव्हां ते म्हणाले, "अहो वासुदेवराव, तुम्ही मोफत शिकवतां हें तुम्हांस फार भूषणावह आहे. मी सुद्धां माझ्या वर्गाला फी घेतों."

युनियन क्लब ही त्यावेळची साताऱ्यांतील फार महत्त्वाची संस्था होती. सर्व सरकारी अधिकारी, वकील मंडळी व गांवांतील प्रतिष्टित नागरिक या संस्थेचे सभासद होते. या सर्व मंडळींना सार्वजनिक कामाची फार आस्था वाटत असे. दादासाहेब करंदीकर, रा. ब. काळे, पाठक हेडमास्तर, बळवंतराव सहस्रबुद्धे, नानासाहेब आगाशे, फणसाळकर, गणपतदास देवी, न. चिं. म्हणजे तात्यासाहेब केळकर वगैरे मंडळी त्यांत प्रमुख होती. या मंडळींचें कर्तव्य विधायक होतें. १८९३ नंतरचा सातारचा चाळीस-पन्नास वर्षांचा इतिहास जर पाहिला तर त्या इतिहासाचें विविध रंगांनीं भरलेलें उंची वस्त्र या मंडळींच्या कर्तृत्वाच्या धाग्यांनींच विणलेलें दिसेल.

युनियन क्लबाच्या कार्यकारी मंडळांत अण्णासाहेब होतेच, तथापि कोणताहि नियम दुरुस्त करावयाचा असला म्हणजे त्या सुधारणा समितींत ते असावयाचेच. अण्णासाहेबांनीं आपल्या सार्वजनिक कार्याचें पहिलें पाऊलच

लाखमोलाच्या एका महान अर्थशास्त्रीय मंत्राच्या उद्घोषणेनें टाकलें. त्यांच्या नांवावरील युनियन क्लब मधला पहिलाच ठराव पुढीलप्रमाणें आहे.

"क्लबनें आपला खर्च आपल्या वर्गणीच्या आंत करावा."

पुढील आयुष्यांत अण्णासाहेबांनीं अनेक व्यापारी संस्था स्वतः काढल्या व इतर अनेक व्यापारी संस्थांचे ते सल्लागार होते. त्या सर्वांना त्यांनीं "आद्यांत खर्च करा" (म्हणजे प्राप्तीपेक्षां खर्च कमी करा) या महामंत्राचें पूजन प्रथम कटाक्षानें शिकविलें व त्या बळावर त्यांच्या यशाची संपूर्ण निश्चिती करून दिली.

या क्लबमधील मंडळींनींच पुढें 'प्रेक्षक' नांवाचें वृत्तपत्र काढलें व आपण चालविलेल्या राजकीय व सामाजिक व शैक्षणिक चळवळीला उचलून धरण्याचें साधन निर्माण केलें. यांत अण्णासाहेब सुंदर इंग्रजी लिहीत व त्या वेळच्या नगरपालिकेच्या कारभारांतील हिशोबाच्या गोंधळावर टीकेची झोड उठवीत.

यामुळें हिशोबाच्या कामांत बारीक नजर ठेवणारे, अत्यंत निःस्पृह व निरलसपणें काम करणारे म्हणून त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें. पुढील निवडणुकींत साताऱ्याच्या जनतेनें त्यांना नगरपिते म्हणून निवडूनहि दिलें.

नगरपालिकेंतील जमाखर्चाचा त्यांनीं खोल अभ्यास केला. अनागोंदो कारभार करणाऱ्यांना योग्य शासन घडविलें. हिशोबाची घडी नीट बसवून दिली. वॉर्डांत प्रत्यक्ष हिंडणें, नाक्यांना भेटी देणें वगैरे गोष्टी ते फार बारोक, दक्षतेनें करीत. सुमारें बावीस वर्षें त्यांनीं विविध अधिकाराच्या जागांवर नगरपालिकेंत अत्यंत तन्मयतेनें काम केलें.

अण्णासाहेब सातारा नगरपालिकेंत गेल्यापासून संस्था चालविण्यासाटीं अवश्य असणाऱ्या अनेक गुणांच्या एका मौल्यवान खाणीचाच सातारकरांना शोध लागला. प्रत्येक गोष्ट ते अगदीं मुळाशीं जाऊन पहात असत.

हीच चिकित्सा बुद्धि त्यांनीं नगरपालिकेच्या कामकाजांत उपयोगांत आणली. म्युनिसिपल कायद्यांचा व तिच्या कारभाराचा त्यांनीं खोल अभ्यास केला आणि एकाहि कागदावर पूर्ण वाचल्याखेरीज त्यांनीं कधीं सही केली नाहीं.

अशांतच १९०५ कर्झनशाहीच्या तांडवनृत्याचें वर्ष उगवलें.

## महाराष्ट्राचें व्यापारी भांडवल

हिंदी लोकमताला कस्पटाप्रमाणें तुच्छ लेखून इंग्रजांनीं बंगालचा फाळणी करण्याचें ठरविलें. या कृत्यामुळें जिकडे तिकडे असंतोषाच्या वडवाग्नीनें पेट घेतला. भगवत् गीतेंत विश्वरूपाचें वर्णन केल्याप्रमाणें लाखों डोळे संतापानें आग ओकूं लागले, लाखों जिभा हृदयांतोल अग्नि बाहेर फेकूं

लागल्या व लाखो लोकांच्या निषेध गर्जनांनीं हिंदुस्थानाचा कानाकोपरा दुमदुमून सोडला. कचेरींतील शिपायापासून राजेमहाराजांपर्यंत सर्व एक झाले आणि या आगीच्या लोळांतूनच स्वदेशाच्या उद्धाराचा महामंत्र रसायनरूपानें पवना येथील सभेंत उच्चारला गेला. तो म्हणजे 'स्वदेशी व बहिष्कार' हा होय.

लोकमान्य टिळकांना आणि इतर पुढाऱ्यांना अत्यानंद झाला. हें दुधारी शस्त्र त्यांना सांपडलें. या दिव्यौषधीनें एका बाजूनें राष्ट्रशरिरांतील रोगाचा नायनाट होणार होता तर दुसऱ्या बाजूनें राष्ट्राच्या शरिरांत शक्तिसंचय होणार होता. ही दिव्यौषधि घेऊनहि तेजाची ज्योत घेऊन ठिकठिकाणचे पुढारी देशाच्या कोपऱ्या कोपऱ्यांतून फिरले.

महाराष्ट्रांत ही आग पसरण्यास वेळ लागला नाहीं. महाराष्ट्र मनानें स्वदेशीमय केव्हांच झाला होता. सार्वजनिक काकांनीं ही आघाडी इकडे अगोदरच सुरू केली होती. स्वदेशी माल वापरण्यांत तो अग्रेसर होता. पण स्वतः तो माल तयार करावयाचा अथवा त्याचा व्यापार करावयाचा या दोनहि कलांमध्यें स्वभाववैशिष्ट्यांमुळें त्या वेळचा महाराष्ट्र बराच मागस होता.

त्यावेळीं महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर काढलेले कारखाने हाताच्या बोटावर मोजण्यासारखे होते व तेहि सर्व औषधांचेच होते. वर्तकी तपकीर व टिकेकर यांची

लुगडीं अशीं एक दोनच दुसऱ्या धंद्यांची नांवें घेतां येतील अशीं होतीं. मनोहर यांचा 'दी पेणकर कटलरी कंपनी लिमिटेड' हा एकच कारखाना जरी नांव घेण्यासारखा होता. या बारीक काजव्यांच्या प्रकाशानें या क्षेत्रांतील महाराष्ट्रांतील अंधाराची निबिडताच जास्त प्रतीत होत होती.

'स्वदेशी व बहिष्कार' या महामंत्राची मशाल सातारा जिल्ह्यांतील पुढारी मंडळी खेडोपाडीं नाचवीत होतीच. अशा त्या काळांत एका दिवशीं साताऱ्यांत एक लहानसें निमित्त घडलें. आपटे यांना गांवांत देशी धोतरजोडी मिळण्यास फार त्रास झाला व त्यासाठीं अव्वाच्या सव्वा किंमत द्यावी लागली. त्यामुळें चिडून त्यांनीं आपणच स्वदेशी मालाचें दुकान कां काढूं नये असा प्रश्न युनियन क्लबमधील मित्रमंडळींसमोर टाकला. याच्या अगोदर सात आठ वेळां साताऱ्यांत असा प्रयत्न झाला होता पण तीं दुकानें बंद करावीं लागलीं होतीं. स्वतः आपटे हे असें अपयश अनुभविलेलेच एक होते. त्यामुळें बऱ्याच मंडळींनीं या कल्पनेस मोडता घातला पण अण्णासाहेबांनीं मात्र असें दुकान काढण्यास पुष्टी दिली.

अण्णासाहेबांनीं दुकान काढण्यास संमति देतांच सर्वांचे विचार फिरले. आणि साताऱ्यांत प्रथमच १९०६ सालीं लिमिटेड कंपनीची स्थापना झाली. तिचे भाग (शेअर्स)

क्लबांतील या कार्याच्या विरोधकांनींसुद्धा घेतले. "खात्रीचा स्वदेशी माल, बेताच्या किमतींत, लहान थोर सर्वांस ठराविक दरानें मिळावा." असा या संस्थेचा हेतु होता. दुकानाचें काम मंडळी उत्साहानें चालवीत होती. सकाळीं ८ वाजतां व सायंकाळीं ५ वाजतां रोज अण्णासाहेब दुकानांत येत. मालाची निवड करणें, त्याचे गट पाडणें, किमती ठरविणें इत्यादि बारीक कामें देखील ते करीत असत. माल कोठून आणावयाचा हें व्यापारी गुपित त्यांनीं माहीत करून घेतलें. हिशोबावर तर त्यांची करडी नजर होती. एकहि पैसा ते वाया जाऊं देत नसत.

दुकानांत प्रथम स्वदेशी कापड विकीत पुढें त्याला स्वस्त मद्रासी साखरेची जोड देण्यांत आली.

## व्यापारांतील चतुरता :

व्यापारांत खेळत्या भांडवलाची पुष्कळ वेळां फार टंचाई भासते व मग प्रगतिमध्यें खंड पडतो असा अनुभव होता. म्हणून सातारा स्वदेशी कंपनीनें दुकानांच्या व्यवहारास पूरक म्हणून ठेवी घेण्यास सुरुवात केली. कंपनीची सूत्रधार मंडळी फार प्रतिष्ठित होती, म्हणून ठेवी पुष्कळ वाढत गेल्या. त्यांत विधवा, विद्यार्थी व अज्ञान यांच्या ठेवींना जरा अधिक सवलती देत असत. पुढें ठेवीची रक्कम लागेल तशी काढण्याची व ठेवण्याची सवलत देण्यांत आली व ती व्याजानें लोकांस देऊंहि लागले. अशा रीतीनें जसें

कापड व साखर हे कंपनीचे दोन विभाग तसा सावकारी ऊर्फ बँकिंग हा कंपनीचा एक विभागच बनला.

कंपनी उत्तम चालू झाली तोंच दुकानांत चोरी झाली. पुढें दुकानाचा मुख्य नोकर नोकरी सोडून गेला. स्वतःचें दुकान काढून त्यानें पुण्यांत व मुंबईंत स्वस्त मद्रासी साखर मोठ्या प्रमाणावर खपविण्यास सुरवात केली. त्यामुळें अण्णासाहेबांच्या कंपनीचें तें गिऱ्हाईक बंद झालें. म्हणून साखर विभाग मंदावला. तसेंच पुढें पुढें स्वदेशी कापड सर्वत्र मिळूं लागलें व या विभागांत चढाओढ सुरू झाली. त्यामुळें हाहि विभाग कंपनीनें बंद केला. वारा बदलला तरी वाऱ्याच्या बदलत्या दिशेप्रमाणें शिडाचा कोन बदलून नाव पुढें पुढें नेण्यांतच नावाड्याचें कौशल्य असतें, व्यापारांतहि बाजाराच्या वळणावर लक्ष ठेवावें लागतें व त्याप्रमाणें व्यवहारांत अवश्य तो फेरबदल करावा लागतो. कापड दुकानाला केवळ मदत म्हणून सावकारी शाखा प्रथम सुरू केली. कापड व साखर हीं खातीं आपलें काम संपवून निघून गेलीं खरीं पण जातां जातां केळीच्या कोंबाप्रमाणें सावकारीच्या (बँकिंगच्या) नव्या रोपट्यास त्यांनीं जन्म दिला. आणि ही शाखाच अनपेक्षितपणें चांगलीच भरारली.

ही संस्था अण्णासाहेबांनीं इतक्या उत्तम रीतीनें चालविली कीं "महाराष्ट्रांत कधीं एक जुटीनें कामें झालीं

आहेत काय ?", "व्यापार करणें हें आपणासारख्याचें काम नाहीं" अशी शंका घेणाऱ्यांचीं तोंडें अगदीं बंद झालीं.

व्यापारांत पैशाला शरिरांतील रक्ताची उपमा आहे. आणि बँक म्हणजे त्या शरिराचें हृदयस्थान आहे. व्यापारी, धंदेवाले, मध्यम स्थितींतील लोक इत्यादि सर्वांना पैशाची गरज लागते. बँक त्यांना पैसा देते. पण ठरलेल्या मुदतींत व्याजासह तो परत येणें आवश्यक असतें. हें करतांना बँकेच्या सूत्रधारांना फार दक्षता ठेवावी लागते. उगीचच कर्जें घेतलीं जाऊं नयेत म्हणून व्याजाचा योग्य दर, मुद्दल परत येण्यासाठीं. योग्य तारण अगर जामीन, व प्रसंगाला उपयोगी पडावी म्हणून प्रमाणबद्ध रोकड शिल्लक अशा या धंद्यांतील अनेक बारीक खोचांवर तीक्ष्ण नजर ठेवावी लागते आणि अण्णासाहेबांनीं तशी ती ठेवली. इतकेंच नव्हे तर त्यासाठीं मन कठोर करून प्रसंगीं कर्तव्यापुढें मित्रप्रेमहि बाजूला सारलें. अण्णासाहेबांनीं सातारा स्वदेशी बँक अतिशय भरभराटीनें चालविली. बँकेस पुष्कळ फायदा होऊं लागला. पण त्यांनीं दहा टक्क्यापेक्षां जास्त नफा भागिदारांना कधींच दिला नाहीं. त्यांनी बँकेची गंगाजळी मात्र वाढविली.

### साताऱ्यांत कल्पवृक्षाची लागवड

सातारा स्वदेशी कमर्शियल कंपनीच्या उत्कर्षामुळें अण्णासाहेबांची व्यापारी तज्ज्ञ म्हणून कीर्ति सर्वत्र पसरली.

आणि या कीर्तिमुळेंच आयुर्विम्याच्या अभिनव आणि अत्यंत विशाल अशा व्यवसायाच्या सागरतीरावर त्यांना उभें केलें.

चिखलांतून ज्याप्रमाणें कमलाची उत्पत्ति होते अगर घाण बुरशीपासून जशी पेनिसिलीन ही दिव्यौषधि निघाली आहे तद्वत् विमाशास्त्राचा उगम युरोपांतील व्यापारी मंडळींच्या सट्टेबाजींतून झाला आहे. समुद्रांतून या व्यापाऱ्यांचीं जहाजें माल घेऊन येत असत. पण वादळामुळें अशीं जहाजेंच्या जहाजें समुद्रांत बुडून जात. त्याचा कांहींच नेम नसे. अशा वेळीं कांहीं पेढीवाले या समुद्रांतील जहाजांच्या तारणावर त्यांच्या मालकांना फारच जबर व्याजाच्या दरानें रकमा कर्जाऊ देण्याचें धाडस करीत असत. जहाज वाटेंत बुडालें तर कर्जाऊ रक्कम परत करावी लागत नसे.

अर्थात् हा व्यवहार त्यावेळीं निव्वळ जुगाराप्रमाणेंच होता. कारण वर्षाकांठीं प्रत्यक्ष किती जहाजें समुद्रांत जा-ये करतात व त्यांतील किती बुडतात याची आंकडेवारी त्यावेळीं उपलब्ध नव्हती. पुढें हे आंकडे जमविण्यांत येऊं लागले व गणितशास्त्राच्या साहाय्यानें त्यांचीं विशिष्ट कोष्टकें तयार करण्यांत आलीं. अशा रीतीनें पुढें या व्यवसायास शास्त्रबद्ध स्वरूप देण्यांत आलें.

समुद्रावरील जोखमीपासून निघालेल्या या कल्पनेची व्याप्ति नंतर आगीपासूनची जोखीम, मनुष्याच्या अकाली मरणाची जोखीम, अपघातांची जोखीम, हवाई जोखीम अशा अनेकविध क्षेत्रांत वाढली. सध्यां या विषयाचें अत्यंत सूक्ष्म शास्त्र बनलें असून जनावरांचा विमा, पिकांचा विमा, स्त्रियांच्या केसांचा विमा, कलावंताच्या बोटांचा विमा अशा अगणित क्षेत्रांत विमा कंपन्या काम करीत आहेत.

यापैकीं आयुर्विम्याचा विकास हें मानवजातीच्या दृष्टीनें परमेश्वरी वरदानच समजलें पाहिजे.

अपमृत्यु हा मानवाला त्यानें केलेल्या कांहीं पापामुळें देवानें दिलेला एक उग्र शाप असावा. मोठ्या सुखांत व वैभवांत असणारा मनुष्य एकाएकीं मृत्यु पावतो व त्यामुळें त्याचें कुटुंब देशोधडीला लागतें. त्याच्या विधवेचे हाल पहावत नाहींत व सोन्यासारख्या मुलांची चाललेली परवड ऐकवत नाहीं. देवानें मनुष्याला अपमृत्यु ही फारच जबर शिक्षा दिली यांत शंका नाहीं.

ही शिक्षा ऐकून मानवानें दीन होऊन देवाची करुणा भाकली व त्या दयासागर परमेश्वरानें कृपावंत होऊन त्याला जणुं उःशाप दिला कीं काय असें वाटतें. 'कांहीं कालानें विचारवंतांच्या डोक्यांतून आयुर्विम्याची कल्पना निघेल व त्यामुळें अपमृत्यूपासून मानवावर येणारी आर्थिक

विपन्नावस्था त्यास पुष्कळ प्रमाणांत कमी करतां येईल,' अशी ती दैवी उःशापवाणी होती.

आयुर्विम्याच्या शास्त्रासाठीं प्रारंभीं खूप मोठ्या प्रमाणावर मानवी मृत्यूच्या संबंधांतील आंकडे एकत्र करण्यांत आले. त्यामुळें सध्या अमुक वयाचा कोणता विशिष्ट मनुष्य यंदा मरण पावणार हें जरी सांगतां आलें नाहीं तरी अशा एक हजारांपैकीं अमुक इतकीं माणसें एका वर्षाच्या अवधींत मरण्याचा संभव आहे हें आज निश्चित सांगतां येतें. अशा स्थितींत या एक हजारांपैकीं प्रत्येकानें थोडी थोडी वर्गणी दिली कीं त्यांच्यापैकीं मरतील त्यांच्या वारसांना ती रक्कम वांटून देतां येते. आयुर्विम्यांत या तऱ्हेनें एका माणसावरील आपत्ति अनेकांनीं अल्पांशानें आपल्याकडे वांटून घेण्याच्या महान मानवी तत्त्वाची गुंफण केलेली आहे.

मानवावर अपमृत्युमुळें जशी आपत्ति येते तशीच ती आपल्या मिळकतीच्या आंत खर्च न केल्यामुळें व कांहींहि संग्रह न केल्यामुळेंहि येते. "मिळविती तितकें भक्षिती। ते कठिण काळीं मरोनि जाती। दीर्घ सूचनेनें वर्तती। तेचि भले ॥" असें रामदासस्वामींनीं स्पष्टपणें सांगितलें आहे. आयुर्विमाशास्त्रांत परस्पर सहकार्याच्या जोडीस बचतीचें हें अमोघ तत्त्व समाविष्ट करण्यांत आलें आहे. या दोन तत्त्वांच्या एकत्रीकरणानें मानवाच्या संसारांतील आर्थिक व्याधीवर रामबाण औषध सांपडलें आहे.

आयुर्विम्यामुळें अपमृत्यु झाला असतां जशी ठराविक रक्कम लगेच मिळते तशी ती ठराविक मुदतीनंतर तो मनुष्य जिवंत असतांनाहि मिळते. स्वतः बाजूस ठेवून सांठविलेली ही रक्कम ज्याची त्यास कुटुंबाच्या अभिवृद्धीला भांडवलरूप होते. अशा रीतीनें त्याच्यापुरती तरी गरिबीची झळ त्याला पोहोंचत नाहीं.

सर्वांनीं मिळून सांठविलेली ही रक्कम राष्ट्राची भव्य गंगाजळी बनते व त्यामुळें खूप मोठीं अशीं राष्ट्रोपयोगीं कामें करतां येतात. पाश्चात्त्य राष्ट्रांमधून सरासरीनें दर माणशीं रु. १०००० चा विमा उतरलेला असतो. त्यामुळें गरिबांना पोसण्याचा खर्च त्या राष्ट्रांना फारसा येत नाहीं. उलट भारतामध्यें आयुर्विम्याची दर माणशीं सरासरी अजून अवघी रु. २०० च्या आसपासच आहे.

भारतांत विसाव्या शतकाच्या प्रारंभास आयुर्विमा हळू-हळू लोकप्रिय होऊं लागला होता. मुख्यतः 'सनलाइफ' सारख्या विराट परदेशी कंपन्या भारतांत हा धंदा करीत असत व 'प्रीमियमच्या' रूपानें अगणित पैसा स्वदेशांत ओढून नेत असत.

सातार्‍यासारख्या छोट्या गांवीं लक्ष्मणराव ऊर्फ काका जोशी हे १९०३ सालापासून विमा एजंटाचें काम करीत असत. एका पायानें ते किंचित् अधू होते. पण त्यांचें कर्तृत्व महादजी शिंद्यांसारखें मोठें होतें. विम्याचा धंदा ते मोठ्या

रुबाबदारपणानें करीत. प्रथम तें 'सनलाइफ' कंपनीचें काम करीत असत. नंतर त्यांनीं 'यूयॉर्क' कंपनीची चीफ एजन्सी घेऊन खूप काम केलें. पण त्यांच्या देशभक्त मनांत एक प्रश्न नेहमीं डांचत असे: 'काय हो ! आपण कष्ट करून आपलेच पैसे परदेशी कंपनींत आपण लोटून कां द्यावे ? आपलीच स्वतःची विमा कंपनी काढतां येणार नाहीं काय ? हा तो प्रश्न होता. पण विमा कंपनी काढावयाची म्हणजे तोंडची गोष्ट नव्हती. फार मोठ्या लोकांचें तें काम होतें. त्याला पुष्कळच पैसा हवा होता. त्यामुळें काका जोश्यांनीं पुण्यामुंबईच्या पुष्कळ बड्या मंडळींना विचारलें. पुष्कळ संस्थानिकांपुढेंहि हा प्रश्न टाकला. पण त्यांना कोणाकडूनहि प्रोत्साहन मिळालें नाहीं. त्या सर्वांना 'हें आपल्यासारख्यांचें काम नाहीं' असेंच वाटत होतें. 'महाराष्ट्राला हें धाडस झेपणारें नव्हे' असें त्या सर्वांचें मत होतें.

एके दिवशीं 'ओरिएंटल' चे दुसरे एक साताराचे विमा एजंट श्री. व्ही. व्ही. जोशी हे काका जोशी यांना सहज रस्त्यांत भेटले. यांनाहि आपली स्वतःची विमा कंपनी असावी असें फार वाटत होतें. त्यांनीं काकांना अण्णासाहेब चिरमुले यांचें नांव या संबंधांत सुचविलें व त्याच पावली ही मंडळी अण्णासाहेबांकडे गेली. "आपली स्वतःची विमा कंपनी काढणें शक्य होईल काय ?" असा त्यांनीं अण्णासाहेबांना प्रश्न केला. त्या लहानशा प्रश्नाचें

उत्तर देण्यासाठीं विचारी अण्णासाहेबांनीं तीन महिने घेतले. तीन महिने अण्णासाहेबांनीं विमा विषयांवर पुष्कळ पुस्तकें वाचलीं व मग आपला निकाल जाहीर केला. "आपण स्वतःचो विमा कंपनी काढून ती चांगली चालविणें शक्य आहे," हा तो निकाल होता.

निरनिराळ्या व्यापारी संस्थांतील कामगिरीमुळें अण्णासाहेबांचा शब्द म्हणजे त्यावेळीं व्यापारी क्षेत्रांतील वेदवाक्यच होतें. काका जोशी यांनीं साताऱ्यांतील सर्व मोठ्या मंडळींना एकाद्या आय्. सी. एस्. च्या परिक्षेंत पहिला नंबर यावा अशा आनंदांत ही गोष्ट सांगितली. या मंडळींनींहि स्वतःची विमा कंपनी काढण्यास संमति दिली पण, पण ती एका अटीवर. ती अट म्हणजे अण्णासाहेब चिरमुले यांनीं आपला चालू व्यवसाय धंदा सोडून देऊन या नियोजित कंपनीचें प्रमुखपद घेतलें पाहिजे, ही होय.

देवदानवांच्या युद्धांत देवांना जय मिळेना. तो मिळविण्यासाठीं त्यांना वज्र तयार करावयाचें होतें. अगस्ति महर्षींनीं आपलीं स्वत्तःचीं हाडें त्यासाठीं द्यावीं अशी मागणी करण्यासाठीं सर्व सुरगण त्यांच्याकडे प्रार्थना करीत आले, अशी कथा आहे. अशा सारखीच ही मागणी होती. अण्णासाहेबांचें वय त्या वेळीं पन्नाशीचें घरांत होतें. या वयांत चालती नोकरी सोडून देऊन अनिश्चिततेच्या अंधारांत उडी घेणें म्हणजे प्रत्यक्ष स्वतःचीं हाडें देण्यापैकींच होतें.

तथापि विश्वकार्यार्थ अगस्ति महर्षींनीं आपलीं हाडें देवांना दिलीं. आणि अण्णासाहेबांनीहि तोच निर्णय ठरविला. महाराष्ट्राच्या उद्योग धंद्याच्या उदयासाठीं त्यांच्या हाडांत मुरलेल्या अनेक गुणसमुच्चयाची गरज होती. अॅ. पोलीस प्रॉसिक्युटरची आपली कायम सरकारी नोकरी सोडून देऊन एका उदयोन्मुख विमा कंपनीचे प्रमुख होण्याचें त्यांनीं मान्य केलें. इतकेंच नव्हे तर पहिलीं कांहीं वर्षें आपल्याला या कामासाठीं कांहीं वेतन नको असेंहि त्यांनीं सांगून टाकलें.

ही संमति मिळतांच दादासाहेब करंदीकर, पाटक, रा. ब. काळे, गणपतदास देवी, आगाशे, आपटे, कडूसकर इत्यादि साताऱ्यांतील सर्व प्रतिष्ठितांनीं एकत्र जमून लगेच १९१३ सालच्या ऑगस्ट महिन्यांत "वेस्टर्न इंडिया विमा कंपनी"ची स्थापना केली. ती नोंदण्यास लागणारी अनामतीची (डिपॉझिट) सर्वच्या सर्व रक्कम एका हातानें वामनराव गोवईकरांनीं दिली. काकाराव जोशी, व्ही.व्ही. जोशी, गोळे वगैरे एजंट मंडळींनीं आपआपल्या कंपन्यांचे राजीनामे देऊन व तिकडील उत्पन्न बुडवून या कंपनीचें काम करण्यास सुरुवात केली. अशा रीतीनें विमा कंपनी काढणें हें काम मोठ्यांचें आहे ही कल्पना साताऱ्यांतील छोट्यांनीं मोडून काढली. काकाराव जोशी यांच्या प्रयत्नानें साताऱ्यांत एका कल्पवृक्षाचें आरोपण झालें.

## व्यापारी महामंत्रांची जपसिद्धी

वेस्टर्न इंडियाचें काम करतांना अण्णासाहेबांनीं आपल्या व्यापारी महामंत्राचा जप प्रथम केला. 'आद्याच्या आंत खर्च' हें त्यांचें सूत्र त्यांनीं येथेंहि अंमलांत आणलें. अत्यंत परिश्रमपूर्वक व अनेक पुस्तकें वाचून त्यांनीं कंपनी-च्या कारभाराची सूक्ष्म तऱ्हेनें मांडणी केली. विम्याचें काम मिळवितांना तें चोखच असेल याबद्दल दक्षता घेतली. कसेंतरी करून कसलें तरी जास्त काम मिळवावें व प्रगति दाखवावी असें त्यांचें धोरण नव्हतें. 'संथपणें पण अव्याहत पुढें पुढें जायचें' या दुसऱ्या उत्कर्षाच्या महामंत्राचे ते उपासक होते. ते स्वतः तर प्रथम पगारच घेत नसत; आणि सर्व एजंट मंडळीहि कंपनी स्वतःची समजून काम करीत असत.

कंपनीच्या घटनेंतच त्यांनीं सर्व विमेदारांना कंपनीचे मालक बनविलें होतें. त्यांच्यातर्फे दोन संचालक (डायरेक्टर्स) व एक हिशोब तपासनीस (ऑडिटर) नेमण्याची प्रथा अण्णासाहेबांनीं पाडली. मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीला आपल्या घटनेंत त्यांनीं पूर्णपणें अर्धचंद्र दिला व पैशाची गुंतवण ट्रस्टी सिक्युरिटीज-मध्येंच करावी असें ठरविलें. पुढें अनेक वर्षांनीं सरकारनें स्वतः कायदा करून वरील सर्व गोष्टी व अण्णासाहेबांचें खर्चाचें धोरण यावर शिक्कामोर्तब केलें व या सर्व गोष्टीं

अमलांत आणल्या यावरून अण्णासाहेबांची कारभाराची बैठक किती बिनचूक आंखलेली व दूरदृष्टीची होती हें कळून येतें.

कंपनीच्या पहिल्या मूल्यमापनांतच वेस्टर्न इंडिया विमा कंपनीस ११००० रुपये फायदा झाला. विमाकंपन्यांच्या इतिहासांत असें क्वचितच घडतें, असें सांगून विमा-गणिति ग. स. मराठे यांनीं त्या वेळीं स्वतः अण्णासाहेबांचें अभिनंदन केलें होतें. दुसऱ्या मूल्यमापनांत तर कंपनीनें विमेदारांस बोनस व भागीदारांना नफा वांटला, म्हणून कंपनीवर सर्व ठिकाणाहून स्तुतिसुमनांचा वर्षाव झाला व महाराष्ट्रभर तिची कीर्ति पसरली.

कंपनीची अशी उत्तरोत्तर प्रगति होत होती व अण्णासाहेब वरचेवर उत्पन्न होणाऱ्या विविध अडचणींना अत्यंत शांतपणानें पण निश्चयीपणानें तोंड देत होते. एक अडचण तर कंपनीच्या एका प्रस्थापकांनींच निर्माण केली. त्यांना कंपनीकडून पैसे हवे होते. अण्णासाहेबांना तसे पैसे देणें गैरवाजवी वाटत होते व त्यामुळें त्यांनीं ते देण्याचें नाकारलें. आपल्याला हवे तसे पैसे मिळत नाहींत असें पाहतांच त्या गृहस्थांनीं अनेक पत्रकें काढून कंपनीच्या कारभाराचीच नालस्ती सुरू केली. पण अण्णासाहेब स्थिर होते. त्यांनींहि एक पत्रक काढून सर्व भागीदार व विमेदार यांच्यापुढें वस्तुस्थिति मांडली. त्यामुळें

वातावरणांत उडालेली धूळ खालीं बसली. यापेक्षांहि कंपनीच्या वाढत्या उत्कर्षामुळेंच सर्व दिशा स्वच्छ होऊन गेल्या. त्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या मूल्यमापनांत तर इतका नफा दिसून आला कीं, कंपनीनें सर्वांत अधिक म्हणजे 'ओरिएंटल' इतका बोनस विमेदारांना वाटला. इतका बोनस एवढ्या लहान वयांत कोणत्याहि कंपनीस आजपर्यंत देतां आलेला नव्हता.

## ससा कासवाची शर्यत

असा कंपनीचा उत्कर्ष चालूं होता. आणि या उत्कर्षांतूनच एक मोठें वादळ निर्माण झालें. कंपनी गुणानें पहिल्या क्रमांकाची झाली होती. पण अंगलटीनें लहान होती. कंपनीच्या कांहीं हितचिंतक मंडळींना असें वाटूं लागलें कीं, हिंदुस्थानांतील इतर कंपन्या एवढ्या वेळांत पुष्कळ मोठ्या झाल्या तरी वेस्टर्न इंडिया ही कां होत नाहीं ? तिला सत्वर मोठी करण्याचें धोरण अंमलांत आणावयाचें असें ठरवून त्यांपैकीं कांहीं मंडळी डायरेक्टरांच्या निवडणुकीस उभी राहिली. त्यांच्या मनांत आपण निवडून आल्यावर अण्णासाहेबांना मॅनेजिंग डायरेक्टरच्या जागेवरून दूर करावयाचें होतें, अशीहि एक अफवा उठली. अशा रीतीनें ससापक्षानें शर्यतीची तयारी चालविली.

अण्णासाहेबांच्यापुढें अर्थातच प्रश्न उभा राहिला. जें संथपणें वाढतें तेंच टिकाऊ असतें, असा त्यांचा विश्वास

होता. तुतीच्या पानापासून रेशमाचे सुंदर धागे काढावयाची इच्छा असल्यास थोडा काल व धीर जरूरच आहे. अशा विश्वासाचें त्यांचें धोरण होतें. याच निष्ठेनें त्यांनीं कंपनीची सेवा अत्यंत निःस्पृहपणें, सावधपणें आणि धोरणीपणानें केली होती, त्यांचें वयहि आतां ६५ च्या सुमाराचें झालें होतें. केलें काम भागीदारांच्यापुढें ठेवावें व कंपनीच्या जबाबदारींतून मोकळें व्हावें म्हणून त्यांनीं एक पत्रक काढलें. त्यांत आपण कंपनीची सेवा कशी केली व तिला फायदा कसाकसा व किती झाला हें सांगून कंपनी जर आज बंद केली तर विमेदार व इतरांचें पूर्ण देणें देऊन, रु. ५० दिलेल्या प्रत्येक भागीदाराला त्याच्या प्रत्येक भागाच्या मागें रु. ३०० मिळतील अशी कंपनीची आर्थिक स्थिति असल्याचें त्यांनीं दाखवून दिलें.

अण्णासाहेबांच्या विरोधी मंडळींनीं एक पत्रक काढलें. त्यांत इतर कांहीं कंपन्या नव्यानें निघून कशा थोडक्या वेळांत मोठ्या झाल्या याबद्दलचे आंकडे दिले होते. अण्णासाहेबांच्या पक्षाच्या मंडळींनीं यावर आपलें पत्रक काढलें व वरील पत्रकांत त्या त्या कंपन्यांचें खर्चाचें प्रमाण, क्लेमसचें प्रमाण व विमेदारांस दिलेल्या फायद्याचें प्रमाण यांचे आंकडे त्यांना गैरसोयीचे म्हणून मुद्दाम कसे गाळले आहेत तें दाखवून दिलें. निवडणूक फारच रणधुमाळीची झाली. विरुद्ध पक्षाच्या मंडळींनीं प्रचाराचा प्रचंड दंगा

उडवून दिला. पण शेवटीं विरुद्धपक्ष पडला. अण्णासाहेबांचे पाठीराखे निवडून येऊन अण्णासाहेबांची कासवाची बाजूच भागीदारांनीं उचलून धरली.

**कार्याची वेल फोफावली :**

विरोधकांचा पराभव झाला. पण विरोधामुळेंच प्रगतीला अधिक गति मिळते. उलटया वाऱ्यांतच पतंग आकाशांत वर चढतो. त्यांतून विरुद्ध पक्षाच्या विरोधांत आपलेपणा होता. त्यांच्या विरोधांतील तत्त्व अण्णासाहेबांनीं आपुलकीनें जाणलें. आतां कंपनीचा पाया चांगला मजबूत झाला होता. म्हणून त्यांनीं इमारतीच्या वरील विस्तारास सुरुवात केली. सिंधप्रांत, नागपूर व मुंबई येथें कंपनीच्या शाखा काढल्या. पंजाब, बंगाल वगैरे दूरच्या प्रांतांतूनहि कंपनीचें काम करणारीं मोठीं माणसें मिळविलीं आणि कंपनीच्या अंतर्गत कारभारासाठीं वरिष्ठ दर्जाच्या पदवीधर अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या.

खर्चाचें प्रमाण कमी, रद्द होणाऱ्या विम्यांचें प्रमाण कमी आणि विमा कामाची उत्तम निवड केल्यामुळें विमेदारांच्या मृत्यूमुळें कंपनीवर पडणारा आर्थिक ताण कमी अशा गुणविशेषांसह वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची प्रगति आतां फार जोरानें होऊं लागली. तिच्या शाखा हिंदुस्थानभर सर्वत्र पसरल्या. तिचें नवें काम दरसाल चार कोटींच्या घरांत जाऊन पोहोंचलें. हिन्दुस्थानांतील अत्यंत

वरिष्ठ दर्जाच्या विमा कंपन्यांतील प्रमुख म्हणून तिचें नांव गाजूं लागलें.

अण्णासाहेबांनीं वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या जोडीस विमा कार्याला जुळत्या व त्याच कार्यातून उद्‌भवणाऱ्या जनसेवेच्या कार्यासाठीं आणखी तीन कंपन्या काढल्या. प्रीमियमच्या रूपानें साताऱ्यांत येणाऱ्या प्रचंड गंगौघाचा उपयोग व्यापारास करून देण्यासाठीं त्यांनीं 'दि युनायटेड वेस्टर्न बँक' स्थापन केली. विम्याच्या पूर्तिनंतर विम्याचा पैसा अनभिज्ञ वारसांच्या हातीं जातो, तो कसा जपावा हें न समजल्यामुळें तो कोठेंतरी नाहींसा होऊन वारसदारांना त्याचा इष्ट फायदा मिळत नाहीं म्हणून अण्णासाहेबांनीं पुढें 'ट्रस्टी' कंपनी काढली. या सर्व कंपन्यांच्या छपाईचें काम पुष्कळ मोठें होऊं लागलें म्हणून त्यांनीं स्वतःचाच 'विमा मुद्रक' नांवाचा छापखानाहि काढला.

कालिदासानें पांच साहित्य प्रबंध लिहिले. त्यांत जसें 'शाकुंतल' श्रेष्ठ व त्यांतहि जसा चवथा अंक श्रेष्ठ, त्याप्रमाणें अण्णासाहेबांनीं स्थापन केलेल्या व आदर्श रीतीनें चालविलेल्या पांचहि संस्थांपैकीं वेस्टर्न इंडिया विमा कंपनी ही त्यांची कर्तृत्वसीमा होती. आणि त्यांतहि तिचा कोट्यावधि विमानिधीचा गुंतवण विभाग फारच मोलाचा होता.

अनेक कोटि रुपयांच्या प्रचंड द्रव्यराशीवर बसून त्यांनीं तिचें तक्षकाप्रमाणें रक्षण केलें. विविध तऱ्हेच्या १००।१२५

कर्जरोख्यांमध्यें व शेअर्समध्यें रकमा गुंतवून त्यांनीं आपल्या भांडवलाची किंमत वाढती ठेवली व व्याजाचा दर वरचा ठेवला. अत्यंत साधी राहणी, अत्यंत शांतपणानें चालविलेला अविरत उद्योग, क्रोधाचा संपूर्ण अभाव हे अण्णासाहेबांचे गुण फारच मोठे होते. त्यांत वरील सर्व संस्थांच्या मालमत्तेची व्याप्ति पांच कोटींच्यावर असतां व सर्व मालमत्तेची उलाढाल ते स्वत: करीत असतां त्यांनीं आपलें मन आणि वर्तन पाण्यांतील कमलपत्राप्रमाणें निर्लेप व मोहातीत ठेवलें. एकदां एका शेअर ब्रोकरनें त्यांच्या-बद्दलचा आदर दर्शविण्यासाठीं कराचीची एक लहानशी पण सुंदर रझई अण्णासाहेबांकडे पाठविली. ती अण्णासाहेबांनीं जशीच्या तशीच परत केली.

त्यांनीं चालविलेल्या सर्व संस्थांतून निदान पांचशें तरी कुटुंबें उत्तम संसार करीत आहेत. पण स्वत:चा असा एकहि मनुष्य अण्णासाहेबांनीं आपल्या एकाहि कंपनींत नोकरीस लावला नाहीं. कंपनीच्या कोणत्याहि नोकरास अगर शिपायास त्यांनीं खाजगी काम कधींहि सांगितलें नाहीं. खाजगी कामासाठीं कंपनींतील कागदाचा एक चिटोराहि त्यांनीं कधीं वापरला नाहीं. एकदां एक मुंब-ईचे मोठे व्यापारी अण्णासाहेबांशीं कांहीं महत्त्वाच्या कामांत वाटाघाटी करण्यासाठीं सातारा येथील कचेरींत आले. तो एक वृद्ध गृहस्थ दौत, टांक, कांहीं कागद, कार्डें,

पाकिटें, टिपकागद असा सरंजाम घेऊन अण्णासाहेबांच्या खोलींत गेलेले त्यांनी पाहिलें.

चौकशी करतां, आंत गेलेले गृहस्थ अण्णासाहेबांचे धाकटे बंधु भास्करराव आहेत असें कळलें. खाजगी कामासाठीं व पत्रव्यवहारासाठीं आण्णासाहेब कचेरींतील कोणताहि जिन्नस वापरीत नसल्यामुळें ते वरील जिन्नस घरून घेऊन आले होते व टपालांत पत्रें टाकण्याचें कामहि पण तेच करणार होते, असेंहि त्यांना समजलें. ही माहिती कळल्याबरोबर त्या व्यापाऱ्याला फार आश्चर्य वाटलें व अण्णासाहेबांच्याबद्दल त्यांच्या मनांत अतीव आदरभाव उत्पन्न झाला.

अण्णासाहेब सातारा स्वदेशी कंपनीचे शेवटपर्यंत म्हणजे सुमारें चव्वेचाळीस वर्षे अखंड अध्यक्ष होते. जगाच्या इतिहासांत असें उदाहरण क्वचितच सांपडेल. या मुदतींत ते रोज दोन तास त्या कंपनीचें काम करीत. पण त्यांनीं त्या कंपनीकडून या अखंड मुदतींत एक पैहि कोणत्याहि स्वरूपांत घेतली नाहीं. बाटलीभॉय यांची मुंबईतील सर्वश्रेष्ठ हिशोब तपासनीस ( ऑडिटर ) म्हणून प्रसिद्धी आहे. त्यांनीं अण्णासाहेबांच्या एका सत्कार प्रसंगीं पुढील संदेश पाठविला. "माझ्या ३३ वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दींत डोळे मिटून जिच्या ताळेबंदावर सही करावी अशी एकच संस्था मला दिसली व ती म्हणजे वेस्टर्न इंडिया ही होय."

अण्णासाहेबांनीं अनेक व्यापारी संस्था चालविल्या. त्यांत मोठें यश मिळविलें. त्या यशाचें रहस्य त्यांच्या अंगच्या वरील अनेक गुणांत आहे. आणि म्हणूनच साहित्यसम्राट् केळकर व ॲक्चुअरी मराठे यांनीं त्यांना महाराष्ट्रीय उद्योगधंद्याचे आदर्श ठरविलें. बॅ. जयकर यांनीं त्यांचें वर्णन "अद्भुत दैवी व्यक्ति व त्यांची अद्‌भुत दैवी संस्था" असें केलें. बिर्लाशेटजींनीं त्यांना प्रचंड वटवृक्षाचे निर्माते ठरविलें. त्यांच्या याच गुणांनीं आकर्षित होऊन भारताचे विश्वकर्मा सर विश्वेश्वरअय्या हे स्वतः सातान्यास अण्णासाहेबांनीं स्थापलेल्या विमादेवीच्या दर्शनास येऊन गेले.

१९५१ सालीं वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची एकूण मालमत्ता सुमारें सहा कोटि रुपयांची होती व प्रीमियमच्या रूपानें सातान्यास दरसाल एक कोटि रुपयांचा ओघ वहात होता. त्यांनीं स्थापलेल्या सर्व कंपन्यांत मिळून सुमारें ५०० नोकर कामावर होते व त्यांचा वार्षिक पगार सुमारें दहा लाख रुपयांच्यावर होता. विमेदारांना वेस्टर्न इंडिया विमा कंपनीकडून सर्वांत जास्त बोनस मिळत होता. कंपनीच्या (शेअर होल्डरांना) भागधारकांना एकदां तर एका भागाला एक संपूर्ण भागच बक्षीस दिल्यानें शेंकडा ३० टक्के डिव्हिडंड मिळत होतें. असें चौफर यश केवळ महाराष्ट्रांतीलच नव्हे तर स

हिंदुस्थानांतील एकाददुसऱ्या कंपनीसच मिळालें होतें. सरकार दरबार व जनता यामध्यें वेस्टर्न इंडिया ही आदर्श विमा संस्था गणली जात होती.

आपल्या वयाच्या ६६ व्या वर्षापर्यंत अण्णासाहेब आपण स्थापलेल्या संस्थांचें संगोपन संथपणें करीत होते. त्यांचा जीवनक्रम घडचाळाच्या कांटचाप्रमाणें ठरीव असे. पुढें पुढें त्यांचा आवाज फारच बारीक झाला व जवळ बसणाऱ्यांनाहि त्यांचें बोलणें ऐकूं येणें कठीण होऊं लागलें. म्हणून एक भारी किंमतीचें आवाज मोठा करणारें यंत्र त्यांच्या मेजावर शेवटीं शेवटीं ठेवीत असत. अशा रीतीनें आपल्या संस्थांच्या कामासाठीं त्यांनीं आपला देह अक्षरशः झिजविला व महाराष्ट्राच्या मनांत व्यापारी जीवनाविषयीं आत्मविश्वास निर्माण केला.

अण्णासाहेब २९-८-१९५१ रोजीं दिवंगत झाले. त्यांनीं निर्याणाच्या वेळीं कोणताहि वाचिक संदेश दिला नाहीं. परंतु मुंगीनें कधीं संदेश देण्यासाठीं तोंड उघडलें आहे ? तिचें अत्यंत मुकाटचानें व अविरत उद्योगानें साध्य केलेलें प्रचंड कार्यफलच तिचा संदेश जगाला सदोदित कळवीत असतें. अण्णासाहेबांनीं अनेक महाराष्ट्रीयांना व्यापारी क्षेत्रांत उत्तेजन देणाऱ्या व मार्गदर्शन करणाऱ्या कार्यप्रणालीचा भव्य दीपस्तंभ सर्वांपुढें उभा केला आहे. आणि म्हणून ते महाराष्ट्राच्या हृद[illegible]हेत.

卐 卐

BVBK-0401257

नालय शाखा.
१२५८ दि. २०।५।८९
बा.वा.

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : बिजापूरकर
४. कादंबरीकार हरिभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लढकरी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. पैशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहाद्दूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई दो चीज उठाव : कुबर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : दत्ताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कस बहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमानमहर्षि : अण्णासाहेब शिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. चंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमो
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखोंचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. आकाशावरचा प्रवास : शिफके
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटू : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

वोरा अॅण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.